Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

३१ /२०२६

**विषय : विद्यापीठ परिसरात दीर्घकालापासून पार्किंग केलेली वाहने तात्काळ काढणेबाबत.**

शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर्स. प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी/विद्यार्थीनी तसेच विद्यापीठ परिसरात राहणारे रहिवासी यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरातील विविध ठिकाणी, जसे की सायकल स्टँड, मुलांचे वसतिगृह, पाच बंगला, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रशाला परिसर, मुख्य इमारत परिसर, अतिथीगृह तसेच इतर पार्किंग स्थळांवर काही चारचाकी व दुचाकी वाहने एक महिना किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीपासून विनावापर एकाच ठिकाणी असल्याचे निदर्शनास येत आहे.

सदर वाहने ज्या व्यक्तींच्या मालकीची आहेत, त्यांनी ही वाहने **ताबडतोब / तत्काळ** संबंधित ठिकाणांहून हटवून स्वता:च्या ठिकाणी घेऊन जावे. अन्यथा सदरचे परिपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून **सात दिवसांच्या आत** वाहने संबंधीत ठिकाणावरुन न काढल्यास, विद्यापीठ प्रशासनाकडून संबंधित वाहनांवर लागू नियमांनुसार **कार्यवाही** करण्यात येईल.

सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन आवश्यक कार्यवाही निर्धारित वेळेत करावी.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

जा. क्र. आस्थापना / 849
दि. 24 JUN 2026
**प्रति,**

१) मा. कुलगुरु, मा. प्र.-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, सर्व संचालक यांचे कार्यालय
२) सर्व अधिविभागप्रमुख, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक व विद्यार्थी/विद्यार्थीनी
३) इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
४) सुरक्षा विभाग – माहितीसाठी व आवश्यकत्या पुढील कार्यवाहीसाठी

**अधिविभाग/प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी/विद्यार्थीनी यांचे निदर्शनास आणावे.**